# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** मोधा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0111 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**27/03/2025 23:39

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 27/03/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 27/03/2025
**Time From (वेळेपासून):** 12:58 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 27/03/2025 **Time (वेळ):** 23:27 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 051

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/03/2025 23:27 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जिल्हा क्रिडा अधिकारी , कार्यालय, परभणी यांचे कबीन ,परभणी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** किशन बालासाहेब भिसे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1981
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अध्यक्ष मानवत स्पोर्टस अकडमी,शिवाजी नगर, मानवत,मानवत,मानवत, परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कोल्हा,मानवत,मानवत,परभणी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9766860714

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कविता माणिकराव निबांळकर- नावंदे | | | 1. जिल्हा क्रिडा अधिकारी, परभणी,परभणी,मोधा,परभणी, महाराष्ट्र,भारत |
| 2 | नानकसिंग महासिंग बस्सी | | | 1. क्रिडा अधिकारी, परभणी, परभणी,परभणी,मोधा,परभणी, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रुपये दराच्या 300 नोटा | 150,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

150,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 27/03/2025

मी किशन बालासाहेब भिसे वय 44 वर्ष, अध्यक्ष मानवत स्पोर्टस अकॅडमी रा. कोल्हा ता. मानवत शिवाजी नगर, मानवत ता. मानवत मोबाईल 9766860714

समक्ष पोलीस ठाणे नवामोंढा, परभणी येथे फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणार असुन मी मानवत स्पोर्टस अॅकॅडमीचा अध्यक्ष आहे. अॅकॅडमीचे जागेवर मी स्विमींग पुलचे 90 टक्के बांधकाम केले आहे. तसेच सन 2024 मध्ये मी मानवत शहरात कबड्डी स्पर्धा भरविल्या होत्या. स्विमींग पुल बांधकामाचे 90 लाख रुपये व क्रिडा स्पर्धेचे 5 लाख रुपये बिल हे जिल्हा क्रिडा अधिकारी श्रीमती कविता नावंदे यांचे कार्यालयात प्रलंबित होते. जिल्हा क्रिडा अधिकारी परभणी यांचे कार्यालयात प्रलंबित असलेल्या बिलाविषयी बोलणेसाठी मी परभणी इथे दि. 03.03.2025 रोजी जिल्हा क्रिडा अधिकारी यांचे कार्यालयात ज्ञानेश्वर रेंगे सर यांचेसोबत गेलो होतो. तेथे जिल्हा क्रिडा अधिकारी श्रीमती कविता नावंदे मॅडम व क्रिडा अधिकारी बस्सी सर यांचेशी माझे प्रलंबित बिलाविषयी चर्चा केली. मॅडमशी झालेली चर्चा माझे सोबत असणारे ज्ञानेश्वर रेंगे यांनी त्यांचे मोबाईल मध्ये रेकॉर्डींग केली होती. सदर चर्चेमध्ये त्यांनी बिलाची फाईल मंजुर करण्यासाठी त्यांना पैसे दयावे लागतील असे सांगितले होते. त्यानंतर कॅबीन बाहेर आल्यानंतर बस्सी साहेबांनी त्यांचे स्वतः साठी 50 हजार रुपये आणि कविता मॅडमचे 2 लाख रुपये असे एकुण अडीच लाख रुपये देण्यास मला सांगितले.

श्रीमती कविता नावंदे मॅडम आणि क्रिडा अधिकारी बस्सी साहेब हे मागत असलेले अडिच लाख रुपये हि लाच असुन मला लाच देण्याची ईच्छा नव्हती परंतु त्यांनी मागीतलेली लाचेची रक्कम मी त्यांना दिली नाही, तर ते माझे बिलाचे काम करणार नाहीत किंवा विनाकारण त्रुटी काढुन त्रास देतील म्हणुन मी दि. 13/03/2025 रोजी 1 लाख रुपये रक्कम घेवुन कविता नावंदे मॅडम कडे गेलो होतो. बस्सी साहेब यांनी सांगितल्याप्रमाणे 1 लाख रुपये रक्कम कविता मॅडम यांना देत असताना त्यांनी मला पॉकिट उघडु नका असे म्हणाल्या. त्याठिकाणी बस्सी साहेबांनी माझेकडील 1 लाख रु असणारे पाकीट घेवुन श्रीमती कविता नावंदे मॅडमचे ड्रॉवर मध्ये ठेवले. श्रीमती कविता नावंदे मॅडम व बस्सी साहेब यांनी मागीतल्याप्रमाणे मी 1 लाख रुपये दिल्याने त्यांनी दि. 19/03/2025 रोजी माझे अॅकॅडमीचे स्विमींग पुलाची 90 लक्ष रुपयाची बिलाची फाईल मंजुर करुन सदर रक्कम माझे अॅकॅडमीचे खात्यात जमा केलेली आहे.

"माझे क्रिडा स्पर्धा आयोजनाचे 5 लक्ष रुपयाचे बिल अदयाप पावेतो जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, परभणी येथे प्रलंबित आहे. ते बील काढण्याची विनंती करण्यासाठी मी जिल्हा क्रिडा अधिकारी कविता नावंदे मॅडम यांना दि. 24/03/2025 रोजी भेटण्यास जाणार आहे., तेथे त्यांनी किंवा बस्सी साहेबांनी बिल काढण्यासाठी किंवा उर्वरीत दिड लक्ष रुपये लाचेची मागणी करुन स्वतः किंवा इतर मार्फत स्विकारल्यास त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी हि विनंती." अषा आषयाची लेखी तक्रार दि. 24/03/2025 रोजी मी ला.प्र.वि. परभणी येथे दिली आहे. मी दिलेल्या तक्रारीवरुन पोउपअधी अशोक इप्पर ला.प्र.वि., परभणी यांनी तालुका कृषी अधिकारी, कार्यालय पालम येथुन (1) श्री. अभयकुमार हनवते व (2) श्रीमती भाग्यश्री वाघमारे यांना पंच म्हणुन उपलब्ध करून घेतले. दोन्ही पंचासमक्ष रेंगे सर यांचे मोबाईल मधील दिनांक 03/03/2025 रोजी जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, परभणी येथे नावंदे मॅडम सोबत झालेल्या चर्चेची रेकॉर्डींग ऐकविली. त्यानंतर दोन्ही पंचानी माझे तक्रार बाबत खात्री करुन त्यावर सहया केल्या आहेत.



Scanned with OKEN Scanner

माझे तक्रारीनुसार दि. 24/03/2025 रोजी जिल्हा क्रिडा अधिकारी, परभणी कार्यालय येथे करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान क्रिडा अधिकारी बस्सी सर यांचे सोबत माझी भेट झाली नाही. त्यामुळे बस्सी सर यांना कॉल करुन विचारपुस केली असता ते बाहेरगावी असल्याचे समजले.
तदनंतर दिनांक 25/03/2025 रोजी सुध्दा जिल्हा क्रिडा अधिकारी, परभणी कार्यालय येथे करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान क्रिडा अधिकारी बस्सी सर यांचे सोबत माझी भेट झाली नाही. त्यामुळे मी बस्सी सरांना कॉल करुन विचारपुस केली असता ते सुट्टीवर असल्याचे समजले. त्यानंतर मी जिल्हा क्रिडा अधिकारी, परभणी श्रीमती नावंदे मॅडम यांची भेट घेतली. त्यावेळी त्या "बस्सी सरांशी बोला आणि करुन टाका" असे म्हणाल्या. त्यावरुन जिल्हा क्रिडा अधिकारी, परभणी श्रीमती नावंदे मॅडम यांनी मला बस्सी सर यांचेशी बोलुन लाचरक्कम देण्याबाबत प्रोत्साहन देवुन रक्कम स्विकारण्यास पंचासमक्ष सहमती दर्शविली.
दिनांक 25/03/2025 रोजी लाचमागणी पडताळणी कार्यवाही मध्ये लोकसेविका नावंदे मॅडम यांनी स्पष्टपणे रक्कम सांगितली नसल्याने मला दोन्ही लोकसेवकांकाडुन पंचासमक्ष स्पष्टपणे लाचेची मागणी झाल्यासच लाचरक्कम देण्याविषयी पोलीस उप अधीक्षक श्री इप्पर यांनी सुचविले. त्यानुसार मी आज दिनांक 27/03/2025 रोजी जिल्हा क्रिडा अधिकारी कविता नावंदे मॅडम यांच्या कार्यालयात जाण्याचे ठरले. तिथे गेल्यानंतर बस्सी सर किंवा नावंदे मॅडम यांनी मला खात्रीपुर्वक लाचेची मागणी केल्यास लाचरक्कम लगेच देतो अशी मी तयारी दर्शविल्याने पोलीस उप अधीक्षक श्री इप्पर यांनी सापळा कार्यवाहीबाबत योग्य सुचना दिल्या.
त्यानुसार मी दोन्ही पंचासमक्ष बस्सी सर यांनी लाचमागणी केलेल्या अडीच लाखातील उर्वरीत दिड लाख रुपये रक्कम ज्यात 500/- रुपये दराच्या 300 नोटा सापळा पथकाकडे जमा केल्या. ला.प्र.वि. विभागातील कर्मचारी यांनी मला व पंचाना अल्ट्राव्हायलेट लॅम्प व अॅथ्रासीन पावडर बाबत माहिती दिली. त्यानंतर प्रात्यक्षीक करुन दाखविले. मी दिलेल्या नोटांना अॅथ्रासीन पावडर लावुन माझे पॅन्टच्या समोरील दोन्ही खिशात 1 लाख रुपये व 50 हजार रुपये असे वेगवेगळे ठेवले.
आज दि. 27/03/2024 रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान जिल्हा क्रिडा अधिकारी, परभणी यांचे कार्यालयात गेल्यानंतर माझी भेट बस्सी सर यांचेशी झाली. त्यावेळी बस्सी सर यांनी दिनांक 03/03/2025 रोजी माझे सोबत प्रलंबित बिलाची रक्कम मंजुर करण्याकरीता मागणी केलेल्या रकमेबाबत बराच वेळ चर्चा करुन दिड लाख रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर मी त्यांचे मागणी नुसार लाचेची रक्कम देण्यास समर्थता दर्शविली असता ते मला जिल्हा क्रिडा अधिकारी, परभणी श्रीमती नावंदे मॅडम यांचे कॅबीन मध्ये घेवुन गेले. त्यांचे सुचनेवरुन मी लाचरक्कम श्रीमती नावंदे मॅडम यांचे समोरील टेबलावर ठेवली. नावंदे मॅडम यांनी 50 हजार रुपये बस्सी सर यांना घेण्यास सांगितले. त्यावेळी बस्सी सर यांनी 50 हजार रुपये लाचरक्कम स्विकारुन त्यांचे पॅन्टचे वॉचखिसा/चोरखिश्यात ठेवली. तसेच श्रीमंती नावंदे मॅडम यांनी उर्वरीत 1 लाख रुपये लाचरक्कम स्विकारुन त्यांचेकडील पर्समध्ये ठेवली. त्यानंतर मी जिल्हा क्रिडा अधिकारी, परभणी कविता नावंदे यांचे दालनाबाहेर येवुन लोकसेवकाने लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला. त्यानुसार सापळा पथकाने पुढील कार्यवाही केली. अशा प्रकारे लोकसेविका कविता माणिकराव निबाळकर-नावंदे, जिल्हा क्रिडा अधिकारी, परभणी व लोकसेवक नानकसिंग महासिंग बस्सी क्रिडा अधिकारी, परभणी यांनी आधी लाचेची मागणी करुन त्याची पुर्तता झाल्यानंतर केलेल्या कामाचा मोबदला म्हणुन तसेच प्रलंबित शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी करुन ती संगणमताने दिनांक 27/3/2025 रोजी 12.58 ते 13.30वा दरम्यान जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, परभणी यांचे कॅबीन मध्ये स्विकारल्यामुळे माझी त्यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद देत आहे.

समक्ष फिर्याद दिली सही



Scanned with OKEN Scanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

sharad subhash mare(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

PSI

पोलीस ठाणे अंमलदार
नवा मोंढा पोलिस स्टेशन,परभणी.

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): sharad subhash mar

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

Scanned with OKEN Scanner